
# परम सन्त
# श्री स्वामी सत्यानंद जी महाराज

**दिव्य मूर्ती** स्वामीजींचा जन्म चैत्र पौर्णिमा इ. स. १८६८ (विक्रम संवत १९२५) या दिवशी सकाळी ५ वाजता एका ब्राह्मण परिवारात ''जग्गू का मोरा'' नावाच्या गावी (पश्चिम पंजाब–सध्याचा पाकिस्तान) झाला. बाल्यावस्थेत असतानाच माता–पित्यांचा देहांत झाल्याकारणाने त्यांचे सुमारे सहा वर्षे वयापर्यंतचे पालनपोषण त्यांच्या आजीने (आईची आई) 'अंकरा' या गावी (जम्मू–काश्मीर) केले. ते दहा वर्षाचे असतानाच त्यांच्या आजीचे देहावसान झाले. जैन साधूंच्या उपदेशाने प्रभावीत होऊन वयाच्या १७ व्या वर्षीच त्यांनी घराचा त्याग केला व त्या साधूंबरोबर राहण्यास सुरुवात केली. वयाच्या एकोणीसाव्या वर्षी ते जैन मुनी झाले. मध्यंतरीच्या काळात संस्कृत भाषेचे अध्ययन करून जैन ग्रंथांचे वाचन केले. ''आध्यात्मिक चिकित्सा'' नावाचा छोटासा ग्रंथ वाचून त्यावर चिंतन केल्याने परमेश्वराची सर्वज्ञता,


अमृतवाणी
(मराठी – स्पष्टीकरण)
रचनाकार
श्री स्वामी सत्यानंद जी महाराज

अपनी संस्कृति से
गाढ़ प्रेम होना
चाहिए'

सत्यानन्द,

# अमृतवाणी

## (मराठी - स्पष्टीकरण)

रचनाकार

श्री स्वामी सत्यानंद जी महाराज

प्रकाशक

**श्री स्वामी सत्यानन्द धर्मार्थ ट्रस्ट**

८ ए, रिंग रोड, लाजपत नगर–४,

नई दिल्ली ११००२४

web.site-shreeramsharnam.org

E-mail address :

shreeramsharnam@hotmail.com

– मराठी –

सम्वत् २०६७ सन् २०१०

सर्वाधिकार सुरक्षित नं. एल–१८६८७/९९

प्रथम संस्करण सन् २०१० प्रति १०,०००

मूल्य : ५ रुपये

मुद्रक :

*यश क्रियेशन*

*बी–४०३, सती स्मृती, राणी सती रोड,*

*मालाड (पूर्व) मुबंई – ४०० ०९७*

*मुबंई प्राप्ति स्थान :*

*श्री राम शरणम् मेटल हाऊस, ग्राऊन्ड फ्लोअर, ब्लॉक नं. ई–१/२,*

*डाया भाई पटेल रोड, जितेन्द्र क्रॉस रोड, मालाड (पूर्व) , मुबई – ९७*

विद्यमानता, सर्वशक्तिमत्ता यावरील त्यांचा विश्वास वाढत गेला. परमेश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपावरील त्यांची श्रद्धा दृढ झाली.

वयाच्या ३० व्या वर्षी जैन साधूंचा प्रेमपूर्वक, संपूर्णपणे कृतज्ञतेने निरोप घेऊन ते आर्य समाजाशी संलग्न झाले. मलेरकोटला (पंजाब) येथे आर्य समाजाच्या सभा मंडपात २८ डिसेंबर १८९१ मध्ये त्यांनी संन्यासदीक्षा ग्रहण केली. त्यानंतर जालंदर येथे वास्तव्य करून शास्त्रांचे सखोल (विधिवत्) अध्ययन केले. उपनिषदे, महाभारत, रामायण तसेच वैदिक कथांवर प्रवचने करण्यास प्रारंभ केला. त्यांची पहाडी आवाजातील मधुर वाणी लाऊड-स्पीकर नसतानाही हजारो लोक ऐकत असत. याच काळात त्यांनी दयानंद प्रकाश, सत्य-उपदेश माला, ॐकार उपासना, आर्य सामाजिक धर्म, संध्यायोग, ईश्वर-दर्शन आणि दयानंद वचनामृत या ग्रंथांची रचनाही केली. त्यातील काही ग्रंथ अजूनही वैदीक संप्रदायामध्ये आदराचे स्थानी आहेत. वैदिक प्रचार त्यांनी जवळ-जवळ २५ वर्षे केला.

सन १९२५ मध्ये दयानंद जन्मशताब्दी महोत्सवाचे वेळी त्यांना एकांतात वास्तव्य करावे अशी आंतरिक प्रेरणा झाली आणि ते हिमाचल प्रदेशातील डलहौसी नावाच्या निर्जन ठिकाणी गेले. तेथे काही काळ अखंड साधना करून असा दृढ निश्चय त्यांनी केला की, ''जो पर्यंत परम (परमात्मा) प्राप्ती होत नाही तो पर्यंत मी येथेच एकाग्रचित्त करून बसून राहिन.'' सुमारे एक महिन्यानंतर, व्यासपौर्णिमेच्या दिवशी प्रार्थना करण्यात निमग्न असताना त्यांना ''राम'' हा शब्द अतिशय सुंदर, आकर्षक व मधुर स्वरात ऐकू आला. त्यानंतर आदेशात्मक शब्द आले की ''राम भज, राम भज–राम राम !'' परमात्म्याच्या तेजस्वी स्वरूपाचे त्यांना दर्शन झाले. परमात्मा श्री ''राम'' यांनाच त्यांनी परम गुरू म्हणून स्वीकार केला. सन १९२८ पासून राम–नामाचे दान (दीक्षा) देण्याचे कार्य सुरू केले. भक्ती प्रकाश, वाल्मीकीय रामायणसार, श्रीमद्‌भगवद्‌गीता, एकादशोपनिषद संग्रह, प्रार्थना व त्याचा प्रभाव, उपासकाचे आंतरिक जीवन, भक्ती व भक्ताचे लक्षण, स्थितप्रज्ञाची लक्षणे, भजन व ध्वनी संग्रह तसेच

तसेच अमृतवाणी अशा अनेक ग्रंथांची रचना त्यांनी केली. अमृतवाणी हा त्यांचा अवतीर्ण झालेला लघु-ग्रंथ आहे. त्यांचे प्रवचनांचे संकलन ''प्रवचन पीयूष'' नावाचे ग्रंथांमध्ये आहे. रामनामाची प्राप्ती करून घेऊन, अशा या पतित-पावन, मधुर, सर्वशक्तीमय नामाची आराधना करून देश-विदेशातील साधक शांतीचा लाभ करून घेत आहेत.

९२ वर्षांचे दीर्घ आयुष्य प्राप्त झालेल्या ह्या सिद्ध महात्म्याने १३ नोव्हेंबर १९६० (संवत २०१७) रात्री १० वाजता दिल्ली येथे निर्वाण पद प्राप्त करून घेतले. विश्वामध्ये असे कोणतेही ठिकाण नाही जिथे स्वामीजींनी रचलेल्या अमृतवाणीचे पठन होत नाही आणि त्यांनी दिलेल्या ''राम-नाम'' प्रसादाचे सेवन होत नाही.

* * * * * * * *

ॐ

## अमृतवाणी

असा वचन-शब्द-समूह जे अमृतासमान आहेत, असे बोल, जे अमरत्व प्रदान करतात- जे अमर करतात, अशी वाणी जी उच्चारल्याने-गाइल्याने व्यक्ती अमर होऊन जाते, ती अमृतवाणी.

## सर्वशक्तिमते परमात्मने श्री रामाय नमः

सर्व शक्तींनी संपन्न असणाऱ्या परमात्मा–श्रीरामाला नमस्कार असो

जो सर्व शक्तींनी युक्त आहे, म्हणजे ज्यांच्या मध्ये सर्वंकष शक्ती विद्यमान आहेत, जे सर्व शक्तींचे स्वामी आहेत, अशा परमात्मा श्रीरामाला नमस्कार असो.

सर्वशक्तीमान परमात्म्यासमोर मी नतमस्तक होत आहे म्हणजेच मी त्यांना शरण येत आहे, मी त्यांना समर्पित आहे.

परमात्मा : सर्वोत्कृष्ट आत्मा (The Supreme Soul)

श्री : श्रीमान्

श्री : शोभा, यश, ऐश्वर्य, विजय, सौभाग्य, वैभव, महिमा, तेज, लक्ष्मी.

# राम–कृपा अवतरण

## (Descent of Ram's Grace)

: श्री राम–कृपा अवतीर्ण होणे.

: भक्तावर श्रीराम–कृपा होणे.

: प्रभु रामाकडून कृपा होणे.

: श्री राम–कृपेचा उदय होणे.

कृपा : अनुग्रह, करुणा, दया.

**परम–कृपा सुरूप है, परम - प्रभु श्री राम ।**
**जन पावन परमात्मा, परम–पुरुष–सुखधाम ।।१।।**

सर्वोत्कृष्ट अशा प्रभू श्रीरामांचे रूप (Form) सुंदर आहे. सर्वोच्च कृपा म्हणजेच ते श्रेष्ठतम कृपा रूप आहेत. त्यांचे रूप कृपाच होय. ते कृपा–रूप परमात्मा, व्यक्तीला पवित्र करणारे आहेत. ते पुरुषोत्तम आहेत.

सर्व परींनी सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम पुरुष आहेत. तसेच सुखाचे निवास-स्थान (Abode) आहेत.

परम : Supreme

**सुखदा है शुभा -कृपा, शक्ति शान्ति स्वरूप ।**
**है ज्ञान आनन्दमयी, राम - कृपा अनूप ।।२।।**

प्रभू रामाचे रूप आहे - परम कृपा (Supreme Grace) परंतु त्यांचे स्वरूप (आंतरिक-स्वभाव) सुख देणारा, मंगल करणारा, आनंद हितकारी-चांगुलपणा-सौभाग्य प्रदान करणारा म्हणजेच त्यांची कृपा जी मोजता न येण्यासारखी आहे, ती ज्ञान आणि आनंदाचे भांडार आहे, शक्ती-सामर्थ्य, शांती-आनंद यांचा अखंडीत प्रवाह आहे. राम-कृपा सुख देणारी आहे, सर्वांचे मंगल करणारी आहे, शक्ती व शांती त्या कृपेचे निज रूप आहेत. ते आनंद आणि ज्ञानाने परिपूर्ण आहे म्हणूनच अनुपम आहे.

*रूप-स्वरूप :* अलंकाराचे रूप आहे- हार, बांगड्या, कुंडल, अंगठी परंतु त्याचे स्वरूप आहे- स्वर्ण. खडीसाखर चपटी आहे, बारीक आहे, दाणेदार आहे. हे खडीसाखरेचे दिसणारे रूप आहे. परंतु खडीसाखरेचे स्वरूप म्हणजे तिची गोडी. प्रत्येक आकारात दिसणारी खडीसाखर मधुरच आहे.

**परम - पुण्य प्रतीक है, परम - ईश का नाम ।**
**तारक-मंत्र शक्ति-घर, बीजाक्षर है राम ।।३।।**

परमेश्वर-स्वामी, सर्वश्रेष्ठ शासनकर्ता म्हणजे भगवंताचे नाव परम पवित्रतेचे चिन्ह आहे- परम शुद्धतेची मूर्ती आहे- नाम. ''राम'' जो शक्तीचा पुंजका होय, तो पूर्ण म्हणजे मूलमंत्र आहे. तो संसार सागरातून पार करणारा आहे, मोक्ष देणारा आहे.

*मंत्र :* सिद्ध केलेला तो शब्द की ज्याचे

उच्चारण आपले रक्षण करतो, जो पाप नाहीसे करणारा आहे म्हणजेच जो आपल्याला पवित्र करून मुक्त (बंधन–रहित) करतो.

*बीजाक्षर :* ''रँ'' अग्निबीज, ''अँ'' सूर्यबीज, ''मँ'' चंद्रबीज या तिन्हींचे एक बीजाक्षर आहे, राम–नाम (राम हा शब्द)

**साधक–साधन साधिए,समझ सकल शुभ–सार ।**
**वाचक – वाच्य एकहै, निश्चित धारविचार ।।४।।**

म्हणून हे साधका ! राम–मंत्राला सर्व शुभ (मंगलाचे) तत्त्व (सार) समजून आध्यात्मिक साधनांचा (प्रकारांचा) अभ्यास कर. ह्या तथ्यावर निश्चित हो कि ज्या वस्तू किंवा शब्दाच्या द्वारे त्याचे वर्णन केले जात आहे ते दोन्ही एकच होय, म्हणजेच आपल्या हृदयामध्ये दृढ विश्वास धारण कर की नाम तसेच नामी, वाचक तसेच वाच्य एकच आहे.

**मंत्रमय ही मानिए, इष्ट देव भगवान् ।**
**देवालय है राम का, राम शब्द गुण खान ।।५।।**

आपले पूज्य असे आराध्य दैवत श्री भगवंत मंत्रामध्ये आसीन–विराजमान आहेत, स्थित आहेत हे जाणून घे. राम–शब्द गुणांचे भांडार आहे, स्त्रोत आहे, पुंजका आहे, ते रामाचे मंदिर आहे, निवास–स्थान आहे.

**राम–नाम आराधिए, भीतर भर ये भाव ।**
**देव–दया अवतरण का, धार चौगुना चाव ।।६।।**

वर वर्णन केलेले भाव आपल्या मनात ठसवून मग रामाची आपल्यावर कृपा होईल अशी प्रबळ इच्छा, उत्सुकता ठेवून, आतुरतेने राम नामाच्या गुणांचे, अर्थाचे चिंतन कर, राम नामाच्या महिम्याचा विचार कर.

**मंत्र धारणा यों कर, विधि से ले कर नाम ।**
**जपिए निश्चय अचल से, शक्ति-धाम श्री राम ।।७।।**

विधिपूर्वक नामाची दीक्षा घेऊन याप्रमाणे राम-मंत्र ग्रहण-धारण करून, आपले चित्त दृढ निश्चयपूर्वक (स्थिरता पूर्वक) मंत्राचे ठिकाणी ठेवून, शक्तीचे निवासस्थान असलेल्या श्रीरामांचा जे शक्तीचे आगार आहेत, वारंवार उच्चार कर (जप कर).

*मंत्र धारणा :* चित्ताला फक्त मंत्राचे ठिकाणी बांधून ठेवणे याचे नाव मंत्र-धारणा असे आहे.

*जप :* राम-नामाच्या अर्थाची भावना करून त्याचा वारंवार उच्चार करणे.

**यथा वृक्ष भी बीज से, जल रज ऋतु-संयोग ।**
**पा कर, विकसे क्रम से, त्यों मंत्र से योग ।।८।।**

जसे बी- पाणी, माती आणि अनुकूल हवामान

यांच्या सहयोगाने हळूहळू वृक्ष बनतो, त्याचप्रमाणे मंत्र जपाने नेहमी आध्यात्मिक प्रगती होत राहते.

*मंत्र योग :* मंत्र साधनेची अशी पद्धत की ज्या द्वारे भगवंताशी एकरूप होता येते.

धारणा, ध्यान आणि समाधी या तिन्हींचा मंत्राने योग साधणे यास मंत्र–योग म्हटले जाते. नामाचा जप करा आणि त्याच्या अर्थाच्या भावनेमध्ये मिसळून जा– हा मंत्रयोगाचा विधी आहे.

**यथा शक्ति परमाणु में, विद्युत् - कोष समान ।**
**है मंत्र त्यों शक्तिमय, ऐसा रखिए ध्यान ।।९।।**

असे ध्यानात ठेवा, असा दृढ विश्वास असावा की ज्याप्रमाणे परमाणू हा शक्तीचे भांडार आहे आणि विद्युत–ग्रह वीजेचा खजीना आहे, अगदी त्याचप्रमाणे मंत्रसुद्धा शक्तीचा खजीना आहे. या मंत्रात पाप–ताप

नाहीसे करण्याची तसेच विशुद्ध भाव प्रफुल्लित करण्याची शक्ती आहे.

**ध्रुव धारणा धार यह, राधिए मंत्र निधान ।**
**हरि-कृपा अवतरण का, पूर्ण रखिए ज्ञान ।।१०।।**

असा अटळ विश्वास (दृढ-निश्चय) ठेवून, मंत्र-निधी असलेल्या राम-मंत्राचे चिंतन करावे (आराधना करावी) तसेच असा मनामध्ये पूर्ण बोध असावा की असे केल्याने हरि-कृपेचा निश्चित उदय होईल, अवश्य अवतीर्ण होईल.

*ध्रुव धारणा :* चित्ताला मंत्रामध्ये अविचलित भावाने बांधून ठेवणे.

*मंत्र निधान :* मंत्राचे भांडार-बीजाक्षर शब्द.

**आता खिड़की द्वार से, पवन तेज का पूर ।**
**है कृपा त्यों आ रही, करती दुर्गुण दूर ।।११।।**

ज्याप्रमाणे खिडकी किंवा दार उघडल्यावर दुर्गंध निघून जातो आणि भरपूर वायू आणि प्रकाश आत येतो, त्याचप्रमाणे राम-कृपा झाल्यावर सर्व दुर्गुण नाहीसे होतात आणि सद्गुण येऊन बसतात.

**बटन दबाने से यथा, आती बिजली - धार ।**
**नाम जाप प्रभाव से, त्यों कृपा - अवतार ।।१२।।**

बटन दाबल्यावर जसा विद्युत-प्रवाह (Current) वाहू लागतो, त्याचप्रमाणे नाम जपाने कृपा अवतीर्ण होत असते.

**खोलते ही जल नल ज्यों, बहता वारि बहाव ।**
**जप से कृपा अवतरित हो, तथा सजग कर भाव ।।१३।।**

नळ सुरू करताच ज्याप्रमाणे पाणी येऊ लागते, वाहू लागते, त्याचप्रमाणे जपामुळे कृपा अवतीर्ण होते की जी भावना उद्दीप्त करते आणि मग आमचा

विश्वास जीवीत (Live-faith) बनून जातो.

**राम शब्द को ध्याइये, मंत्र तारक मान ।**
**स्वशक्ति सत्ता जग करे, उपरि चक्र को यान ।।१४।।**

मंत्राला उद्धारकर्ता, निस्तारक, मुक्तीदाता मानून 'राम' शब्दावर ध्यान लावावे. असे केल्याने आत्म–शक्ती तसेच आपलेपणाचा भाव–अस्तित्व जागृत होते आणि ही शक्ती उर्ध्व–चक्राकडे मार्गस्थ होते.

*चक्र :* योगशास्त्रानुसार शरीरात आठ चक्रे आहेत; ती अशी– मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर (नाभिचक्र), अनाहत (हृदय), विशुद्ध (कंठ), आज्ञा (त्रिकुटी), बिन्दू (ग्रीवा–मानेच्या वरची बाजू) आणि सहस्त्रार (टाळू).

*उपरि चक्र :* आज्ञा, बिन्दू आणि सहस्त्रार.

**दशम द्वार से हो तभी, राम - कृपा अवतार ।**
**ज्ञान शक्ति आनन्द सह, साम शक्ति संचार ।।१५।।**

तेव्हा दशम द्वारातून राम--कृपेचा प्रवेश होतो की ज्यामुळे आत्म–बोध–प्रबुद्धता (आत्मबोधाची वरची पायरी), बल, आनंद यांचेसह मनाला स्थिर आणि शांत करणाऱ्या सर्व शक्तींचा विस्तार–संचार होतो.

*दशम द्वार :* मानव देहाला नऊ द्वारांची नगरी म्हटली जाते. दोन दारे डोळ्यांची, दोन कानांची, दोन नाकाची, एक मुख तसेच मल–मूत्र विसर्जन करणारी दोन दारे. दशम–द्वार अदृश्य आहे आणि ते नऊ दारांच्या वर आहे.

**देव दया स्वशक्ति का, सहस्र कमल में मिलाप ।**
**हो सत्पुरुष संयोग से, सर्व नष्ट हों पाप ।।१६।।**

सत्पुरुषाच्या सान्निध्याने तसेच परमेश्वराच्या कृपेने कुंडलिनी शक्तीचे हजार पाकळ्या असणारे कमळ–सहस्त्रार, ब्रह्मधामामध्ये मिलन होते व त्यामुळे सर्व पाप नष्ट होतात.

ईश्वरकृपेने त्या स्वशक्तीचा हजार पाकळ्या असलेल्या कमल–सहस्त्र दल कमलाशी मिलाप होतो. परंतु यासाठी सत्पुरुषाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते व तेव्हाच जीवाचे सर्व दोष नाश होऊ शकतात. परम कल्याणाची प्राप्ती होण्यासाठी भगवंतांची कृपा, आत्म–शक्ती आणि संतांची कृपादृष्टी हे तीन्ही अपेक्षित आहेत. या सर्वांचा येथे भगवद्कृपा, स्व–शक्ती आणि सत्पुरुषाचा संयोग असा उल्लेख केला आहे.

# नमस्कार सप्तक

## नमस्काराचे सात श्लोक (पदे)

**करता हूं मैं वन्दना, नत शिर बारम्बार ।**
**तुझे देव परमात्मन्, मंगल शिव शुभकार ।।१।।**

मंगल, कल्याण व शुभ करणाऱ्या हे परमात्मदेवा, नतमस्तक होऊन मी आपणास वारंवार नमस्कार करीत आहे.

वंदना : नमस्कार

मंगल : कल्याणप्रद, समृद्धी– ज्यामुळे आपली उत्तरोत्तर प्रगती होते. (Benediction)

शिव : सौभाग्य, शांती (Happiness, Peace)

शुभ : शुभ, शकुन, कल्याण (Auspicious)

**अंजलि पर मस्तक किये, विनय भक्ति के साथ ।**
**नमस्कार मेरा तुझे, होवे जग के नाथ ।।२।।**

सर्व विश्वाचा स्वामी असणाऱ्या हे देवा, दोन्ही

हात जोडून, मस्तक लववून, नम्रता व भक्तीपूर्वक मी आपणास नमस्कार करीत आहे.

**दोनों कर को जोड़ कर, मस्तक घुटने टेक ।**
**तुझ को हो प्रणाम मम, शत-शत कोटि अनेक ।।३।।**

दोन्ही हात जोडून, मस्तक आणि गुडघे जमिनीवर टेकवून आपणास माझे शेकडो-करोडो नमस्कार असोत.

**पाप-हरण मंगल-करण, चरण-शरण का ध्यान ।**
**धार करूँ प्रणाम मैं, तुझ को शक्ति-निधान ।।४।।**

पापांचा नाश व मंगल करणाऱ्या आपल्या चरण-कमलांचे ध्यान करीत, शक्तीचा खजीना असणाऱ्या आपणास मी नमस्कार करीत आहे.

**भक्ति-भाव शुभ-भावना, मन में भर भरपूर ।**
**श्रद्धा से तुझ को नमूँ, मेरे राम हज़ूर ।।५।।**

माझे मन भक्तिपूर्ण आणि पुरेपूर सद्‌भावनांनी

भरून, हे माझ्या राम प्रभो ! मी आपणास श्रद्धापूर्वक नमस्कार करीत आहे.

**ज्योतिर्मय जगदीश हे, तेजोमय अपार ।**
**परम पुरुष पावन परम, तुझ को हो नमस्कार ।। ६ ।।**

हे प्रकाशस्वरूप, अत्यंत ऊर्जा असणारे जगताचे स्वामी ! हे सर्वांना पूर्णपणे पवित्र करणाऱ्या, सर्वोत्तम परमात्म्या (पुरुषोत्तम) ! तुला नमस्कार असो.

**सत्य ज्ञान आनन्द के, परम धाम श्री राम ।**
**पुलकित हो मेरा तुझे, होवे बहु प्रणाम ।। ७ ।।**

हे सत्य, ज्ञान आणि आनंदाचे सर्वोच्च मंदिर असणाऱ्या श्रीरामा ! गद्गदीत-रोमांचित झालेल्या माझे तुला अनंत नमस्कार असोत. या ठिकाणी रामाला सत्य, ज्ञान, आनंदाचे परम-धाम म्हणजेच अनंत ब्रह्मस्वरूप म्हटले आहे.

# प्रात: कालीन पाठ

**परमात्मा श्री राम परम-सत्य, प्रकाश-रूप, परम ज्ञानानन्दस्वरूप, सर्वशक्तिमान्, एकैवाद्वितीय परमेश्वर, परम - पुरुष, दयालु देवाधिदेव है, उसको बार-बार नमस्कार, नमस्कार, नमस्कार, नमस्कार।।**

सर्वोत्तम, महानतम, आत्मा श्री राम, परम सत्य (Absolute Truth) अपरिवर्तनशील तत्त्व, तेजोमय, सर्वोच्च ज्ञान, सर्वाधिक आनंद देणे हा ज्याचा स्वभाव आहे, सर्व शक्तींनी युक्त, ज्याच्यासारखा दुसरा कोणी नाही, ज्यापासून वेगळं कोणी ही नाही, सर्वांचा शासक, स्वामी, पुरुषोत्तम, दयाळू, सर्व देवांचाही देव आहे, त्याला वारंवार नमस्कार, नमस्कार, नमस्कार, नमस्कार !

# अमृतवाणी

**रामामृत पद पावन वाणी,**
**राम - नाम धुन सुधा समानी।**
**पावन - पाठ राम - गुण - ग्राम,**
**राम - राम जप राम ही राम।।१।।**

राम हा अमरत्व प्रदान करणारा शब्द आहे, पवित्र करणारा बोल आहे; राम नामाचे गायन अमृतासमान आहे. रामाच्या गुणांचा समूह हा पवित्र पाठ आहे, शुद्ध करणारा आहे, म्हणून राम–राम राम–च–राम असा वारंवार उच्चार करा.

**परम सत्य परम विज्ञान,**
**ज्योति–स्वरूप राम भगवान्।**
**परमानन्द, सर्वशक्तिमान्,**
**राम परम है राम महान्।।२।।**

राम परम सत्य आहे (Absolute Truth) तो

सर्वोच्च अनुभवयुक्त ज्ञान आहे, राम भगवान प्रकाश–स्वरूप आहेत सर्वोत्कृष्ट आनंद आहेत तसेच सर्व प्रकारच्या शक्तींनी ते संपन्न आहेत, राम महान तसेच सर्वोत्तम आहेत.

**अमृत वाणी नाम उच्चारण,**
**राम - राम सुखसिद्धि–कारण।**
**अमृतवाणी अमृत श्री नाम,**
**राम - राम मुद मंगल–धाम।।३।।**

राम नामाचा उच्चार म्हणजे अमृत हा शब्दच उच्चारण्यासारखे आहे, 'राम–राम' उच्चार सुख, सफलता प्रदान करणारा आहे. ते नाम अमृत आहे, अमृताचा बोल आहे आणि आनंद तसेच अप्रतिम हर्ष प्रदान करणारा आहे.

**अमृतरूप राम–गुण गान,**
**अमृत–कथन राम व्याख्यान।**
**अमृत–वचन राम की चर्चा,**
**सुधा सम गीत राम की अर्चा।।४।।**

रामाच्या गुणांचे गायन (स्तुती) हे अमृता समान आहे, रामकथा अमृतच जणू, रामाची चर्चा करणारे शब्दही अमृत आहेत आणि त्यांची पूजा हे अमृतासमान गीतच होय.

**अमृत मनन राम का जाप,**
**राम - राम प्रभु राम अलाप।**
**अमृत चिन्तन राम का ध्यान,**
**राम शब्द में शुचि समाधान।।५।।**

रामाचा जप हे मनाचे विचार रूपी अमृत आहे, राम–राम प्रभु राम. हा अमृतरूपी संवाद आहे. रामाचे ध्यान करणे म्हणजे चित्ताने केलेले अमृत चिंतन होय म्हणजेच राम शब्दामध्ये जप, धारणा, ध्यान हा सर्व अभ्यास करण्यासाठी राम शब्द उपयुक्त आहे.

मनन, जप, आलाप (गायन), चिंतन, ध्यान, समाधान हे सर्व राम–नामाशी संलग्न केल्याने अमृतासमान होतात. जप हा शब्दाचा होतो आणि मनन अर्थाचे होते. आलाप (गायन) स्वराचे आणि

चिंतन तत्त्वाचे होते. ध्यान स्वरूपाचे तर समाधानामध्ये (समाधीमध्ये) त्रिपुटींचा (ध्येय, ध्याता, ध्यान) लय होतो.

**अमृत रसना वही कहावे,**
**राम - राम जहाँ नाम सुहावे।**
**अमृत कर्म नाम कमाई,**
**राम - राम परम सुखदाई ।।६।।**

ज्या जिभेवर राम–राम हे नाम शोभते, विलसते, तीच जिव्हा अमृत–तुल्य, मधुर आहे. राम नामाची संचित पूंजी (ठेव) सुकृत–सत्कर्म आहे, राम–राम अविनाशी, आत्यंतिक सुख असा देणारा आहे.

**अमृत राम - नाम जो ही ध्यावे,**
**अमृत पद सो ही जन पावे।**
**राम - नाम अमृत-रस सार,**
**देता परम आनन्द अपार ।।७।।**

जी व्यक्ती या अमृतमय-मधुर अशा राम-नामाचे ध्यान करते, तीच अविनाशी-पद (मोक्ष-पद) प्राप्त करून घेते म्हणजेच जेथून पुन्हा परत ह्या संसारात यावे लागत नाही, ते स्थान ती प्राप्त करून घेते. परमात्मा हा रस स्वरूप आहे, अविनाशी आहे, अमृत आहे. त्या अमृत-रसाचे सार हे राम-नाम आहे जो अत्युच्च सर्वोत्तम आनंद देतो.

(अमृत-पद अशा स्थितीला पण म्हणतात की जे स्वतः तर अमर आहेच पण इतरांनाही अमर करण्यास समर्थ आहे.)

**राम - राम जप हे मना,**
**अमृत वाणी मान।**
**राम - नाम में राम को,**
**सदा विराजित जान।।८।।**

अरे मना ! राम-राम या शब्दाला अमरत्व

देणारा शब्द मानून याचाच वारंवार उच्चार कर, जप कर. या नामामध्ये परब्रह्म परमात्मा श्री राम सदैव विराजमान (विद्यमान) आहे हे जाणून घे.

**राम – नाम मुद मंगलकारी,**
**विघ्न हरे सब पातक हारी।**
**राम – नाम शुभ – शकुन महान्,**
**स्वस्ति शान्ति शिवकर कल्याण।।९।।**

राम–नाम हे आनंदित तसेच कल्याण करणारे आहे, अडथळे (विघ्न) दूर करणारे आणि पाप नष्ट करणारे आहे. राम–नाम हे शुभ तसेच परम लक्षण (Omen) आहे, शांती, मंगल, कल्याण व मन प्रसन्न करणारे आहे.

**राम – राम श्री राम – विचार,**
**मानिए उत्तम मंगलाचार।**
**राम – राम मन सुख से गाना,**
**मानो मधुर मनोरथ पाना।।१०।।**

राम–नामाचा विचार मनात उत्पन्न होणे सर्वोत्तम शुभारंभ आहे असे समज. मुखाने तसेच मनाने– राम–राम शब्दाचा उच्चार (Chanting) केल्याने मनात इच्छिलेल्या वस्तूची प्राप्ती होते म्हणजेच सर्व इच्छा पूर्ण होतात.

(मधुर मनोरथ : ईश्वर दर्शन)

**राम – नाम जो जन मन लावे,**
**उस में शुभ सभी बस जावे।**
**जहाँ हो राम – नाम धुन–नाद,**
**भागें वहाँ से विषम – विषाद।।११।।**

जो माणूस आपल्या मनामध्ये राम–नाम स्थिर करतो त्याचे ठिकाणी सर्व प्रकारची धन्यता निवास करते, त्याला सौभाग्य, सुख, समृद्धी म्हणजेच सर्व प्रकारे आशीर्वाद प्राप्त होतात. जेथे राम–नामाचा जयघोष चालतो तेथून दुःख, पीडा देणारे शोक संकटे पळून जातात.

*विषम–विषाद :* सत्वगुणामुळे सुख, रजोगुणामुळे दु:ख आणि तमोगुणामुळे विषाद, आळस, प्रमाद यांचा प्रादुर्भाव होतो. विषाद हे असे दु:ख आहे की, त्यातून लवकर सुटण्याचा उपाय सापडत नाही. जेव्हा विषम (प्रभावी) होतो तेव्हा माणसाला काहीही सुचत नाही.

**राम – नाम मन–तप्त बुझावे,**
**सुधा रस सींच शांति ले आवे।**
**राम – राम जपिए कर भाव,**
**सुविधा सुविधि बने बनाव ।।१२।।**

राम–नाम हे मनातील पीडा (व्यथा) दूर करून अमृत–तत्त्वाच्या शिडकाव्याने मन शांत करते. म्हणून भावयुक्त, प्रेमयुक्त अंत:करणाने राम–नामाचा जप करा. त्यामुळे सर्वप्रकारची अनुकूलता अगदी चांगल्या प्रकारे निर्माण होत असते, सर्व प्रकारे मन:शांती, सुख निर्माण होते.

**राम – नाम सिमरो सदा,**
**अतिशय मंगल मूल।**
**विषम–विकट संकट हरण,**
**कारक सब अनुकूल ।।१३।।**

हे साधका ! राम–नामाचा नेहमी प्रेमाने जप कर, राम–नामाचे स्मरण ठेव, जे अत्यंत मंगल करणारे आहे, ते मंगलाचा प्रवाह आहे तसेच त्रासदायक, सहन न होणारे व भयानक असे दुःख, संकटे दूर करून म्हणजेच सर्व प्रकारची प्रतिकूलता नाहीशी करून अनुकूलता प्राप्त करून देणारे आहे, ते सर्व प्रकारे रोचक, लाभदायक आणि सुख देणारे आहे.

*विषम–विकट संकट :* एकाच वेळी सर्व बाजूंनी सहन न होण्यासारखी व भयंकर संकटे येऊन धडकणे.

**जपना राम - राम है सुकृत,**
**राम - नाम है नाशक दुष्कृत।**
**सिमरे राम - राम ही जो जन,**
**उसका हो शुचितर तन - मन॥१४॥**

राम–नामाचा जप करणे हे एक सत्कर्म आहे, पुण्य–कर्म आहे, राम–नाम हे कुकर्मांचा (पाप–कर्मांचा) नाश करणारे आहे, जो कोणी राम–नामाचा भावपूर्वक जप करतो त्याचे शरीर व मन दोन्हीही अत्यंत शुद्ध होतात.

**जिसमें राम - नाम शुभ जागे,**
**उस के पाप - ताप सब भागे।**
**मन से राम - नाम जो उच्चारे,**
**उस के भागें भ्रम भय सारे॥१५॥**

राम–नामाची शुभ भावना ज्याच्या मनात जागी होते, त्याचे पाप व दुःख दूर निघून जाते, राम–

नामाचा जो मनापासून उच्चार करतो त्याचे सर्व संशय आणि भय नाहीसे होते.

*ताप :* तीन प्रकारची दु:खे (१) आध्यात्मिक (देहाची व मनाची) ज्वर, काम, क्रोध, चिंता, शोक इ. (२) आधिभौतिक : दुसऱ्या प्राण्याकडून दु:ख प्राप्ती जसे चोर, साप, विंचू इ. कडून (३) आधिदैविक : दैवी कारणामुळे (कोपामुळे) होणारे दु:ख, जसे भूकंप, महापूर, दुष्काळ इ.

*भय :* अनिष्ट होण्याची शंका जसे जन, धन, मानहानि इ., रोग, मृत्यू यांचे भय.

**जिस में बस जाय राम सुनाम,**
**होवे वह जन पूर्णकाम।**
**चित्त में राम - राम जो सिमरे,**
**निश्चय भव - सागर से तरे ।।१६।।**

रामाचे सुंदर, मधुर, समृद्ध असे नाव ज्याच्या

मनामध्ये वसते, त्या व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. जो कोणी चित्तामध्ये राम–नामाचे स्मरण करतो तो निश्चितच संसार–सागर तरुन जातो, मुक्त होतो.

**राम – सिमरन होवे सहाई,**
**राम – सिमरन है सुखदाई।**
**राम – सिमरन सब से ऊँचा,**
**राम शक्ति सुख ज्ञान समूचा॥१७॥**

राम–नाम जप सहाय्य करणारा आहे (प्रत्येक कामना पूर्ण करणारा) सुख देणारा आहे. स्मरण तर सर्वोच्च–सर्व कर्मामध्ये उच्चतम कर्म आहे कारण प्रभू रामचंद्र तर बळ–सामर्थ्य, सर्व शक्तींच्या ठायी असलेले सर्व सुख तसेच ते पूर्ण ज्ञान प्रकाशाची पूंजीच आहेत.

*सिमरन :* भावयुक्त अंत:करणाने भगवन्नामाचा उच्चार करणे.

**राम - राम ही सिमर मन,**
**राम - राम श्री राम।**
**राम - राम श्री राम-भज,**
**राम - राम हरि - नाम ।।१८।।**

अरे मना ! राम-नामाचेच स्मरण कर, राम-राम (हे नामच) परमेश्वर राम आहे. राम-राम प्रभू रामाच्या नामाच्या रसाचा स्वाद घे. राम-राम हे हरिचे नाव आहे.

*हरि :* पापांचे हरण करणारा परमात्मा.

(*भज :* गाय ज्याप्रमाणे चारा खावून रवंथ करते व चाऱ्यातील रस शोषून घेते त्याचप्रमाणे प्रभू-रामाचे मनापासून वारंवार स्मरण करून रसस्वाद ग्रहण करणे यासच भजन-भजणे असे म्हणतात.)

**मात–पिता बान्धव सुत दारा,**
**धन जन साजन सखा प्यारा।**
**अन्त काल दे सके न सहारा,**
**राम–नाम तेरा तारन हारा।।१९।।**

माता–पिता, बंधू, पुत्र, पत्नी, धन, सगे–सोयरे, पति–प्रियतम, प्रिय, मित्र, मरणकाळी यापैकी कोणाचेच सहाय्य होत नाही, फक्त राम–नामच तुला तारणारे आहे, तुझे संरक्षण करणारे आहे.

**सिमरन राम – नाम है संगी,**
**सखा स्नेही सुहृद् शुभ अंगी।**
**युग – युग का है राम सहेला,**
**राम – भक्त नहीं रहे अकेला।।२०।।**

राम–नामाचे स्मरणच तुझा साथीदार, मित्र, प्रेमी, हित करणारा तसेच अत्यंत शुभ असे आहे.

राम तर अनादी काळापासून प्रत्येक युगामध्ये, आपल्या बरोबर राहणारा आहे. नेहमी साथ देणारा आहे. म्हणजेच रामाचा भक्त कधीच एकाकी असत नाही. प्रभू राम नेहमी आपल्या भक्ताबरोबर असतात.

**निर्जन - वन विपद् हो घोर,**
**निबिड़-निशा तम सब ओर।**
**जोत जब राम - नाम की जगे,**
**संकट सर्व सहज से भगे।।२१।।**

निर्जन जंगल असो, भयंकर आपत्ती संकट असो, घनघोर रात्रीचा अंध:कार सगळीकडे पसरलेला असो, जशी राम-नामाची ज्योत प्रज्वलीत होईल तसेच अगदी सहजपणे सर्व दु:ख, दुर्भाग्य प्रतिकूल दिवस दूर पळतात.

**बाधा बड़ी विषम जब आवे,**
**वैर विरोध विघ्न बढ़ जावे।**
**राम – नाम जपिए सुख दाता,**
**सच्चा साथी जो हितकर त्राता।।२२।।**

जेव्हा अतिशय बिकट प्रसंग येतो, शत्रुत्व, प्रतिकूल परिस्थिती तसेच अनेक अडचणी येतात तेव्हा राम–नाम हेच खरे मित्र, नेहमी हित करणारे तसेच संरक्षण करणारे आहे, तसेच सुख देणारे आहे, त्याचा जप करा.

**मन जब धैर्य को नहीं पावे,**
**कुचिन्ता चित्त को चूर बनावे।**
**राम – नाम जपे चिन्ता चूरक,**
**चिन्तामणि चित्त चिन्तन पूरक।।२३।।**

धैर्य, दृढता जेव्हा मनाला सोडून जाते म्हणजेच स्थैर्य प्राप्त होत नाही, दुष्ट चिंता चित्ताच्या चिंधड्या

उडविते, चिंतेने चित्त घेरले जाते, तेव्हा चिंतांचे चूर्ण करणारे, नाश करणारे राम–नाम जणू चिंतामणीच आहे, ते चित्तात उठणारे सर्व संकल्प, सर्व इच्छा पूर्ण करणारे आहे, त्या नावाचे आपल्या भोवती आवरण घालून घ्या, त्या नावाला वारंवार जपा.

*चिंतामणी :* अभीष्ट, मनात असलेले फळ देणारे एक कल्पित रत्न.

**शोक सागर हो उमड़ा आता,**
**अति दु:ख में मन घबराता।**
**भजिए राम - राम बहु बार,**
**जन का करता बेड़ा पार।।२४।।**

औदासिन्याचा समुद्र जेव्हा हाहा:कार माजवेल म्हणजेच संकट समुद्राला पूर येईल आणि अतीव दु:खामुळे मन घाबरे–घुबरे होईल, पीडीत होईल, व्याकूळ होईल, तेव्हा संकट समयी धीर देणाऱ्या

राम–नामाचा वारंवार प्रेमपूर्वक जप करावा कारण राम–नाम हे संकट रूपी सागरातून मानवाच्या जीवनरूपी नावेला पार करून नेणारे आहे.

**कड़ी घड़ी कठिनतर काल,**
**कष्ट कठोर हो क्लेश कराल।**
**राम – राम जपिए प्रतिपाल,**
**सुख दाता प्रभु दीनदयाल ।।२५।।**

संकटसमयी चोवीस तास आणि कठीण परिस्थितीत किंवा अतिशय कठोर कष्टांनी आणि भयानक व्यथा–क्लेश यांनी जेव्हा माणसाला घेरले जाते तेव्हा पालन करणारा, सुख देणारा, दीनांवर दया करणाऱ्या प्रभू रामाच्या नामाचा जप कर.

*क्लेश :* पांच क्लेश असे १) अविद्या २) अस्मिता ३) राग ४) द्वेष ५) अभिनिवेश, यांना अविद्येच्या

पाच ग्रंथी किंवा क्लेशाचे कारणही समजले जाते.

**घटना घोर घटे जिस बेर,**
**दुर्जन दुखड़े लेवें घेर।**
**जपिए राम - नाम बिन देर,**
**रखिए राम - राम शुभ टेर॥२६॥**

जेव्हा एखादी भयंकर घटना घडते आणि वाईट माणसाची संगत, तसेच दुःखाने घेरल्यास त्याने अजिबात वेळ न गमावता, ताबडतोब राम-राम असा जप करावा आणि राम-राम अशी हितैषी, अनुग्रहशील पुकार-रत्न सुरू ठेवावे, म्हणजेच आर्त होऊन (भाव-भक्तीने) आवाहन करत राहा.

**राम - नाम हो सदा सहायक,**
**राम - नाम सर्व सुखदायक।**
**राम - राम प्रभु राम की टेक,**
**शरण शान्ति आश्रय है एक॥२७॥**

राम नाम नेहमी सहाय्य करील, राम–नाम सर्व प्रकारे सुख प्राप्त करून देईल. राम–राम प्रभू रामाचाच एकमेव आधार–सहारा आहे आणि त्यांना शरण जाणे म्हणजेच शांतीस्थानात पोहोचणे.

**पूँजी राम - नाम की पाइये,**
**पाथेय साथ नाम ले जाइये।**
**नाशे जन्म मरण का खटका,**
**रहे राम - भक्त नहीं अटका।।२८।।**

म्हणून राम–नामाची संपत्ती मिळवा आणि तिचा संचय करा. जीवन यात्रेवरील मार्गावर होणारा खर्च आणि जवळ बाळगण्यासाठी नामाचीच संपत्ती जवळ घ्या. यामुळे जन्म–मरणाची भीती नष्ट होईल आणि राम–भक्ताची यात्रा निर्विघ्नपणे पार पडेल, तो मध्ये कोठेच थांबून राहणार नाही.

**राम – राम श्री राम है,**
**तीन लोक का नाथ।**
**परम – पुरुष पावन प्रभु,**
**सदा का संगी साथ॥२९॥**

राम–राम श्रीराम तिन्ही लोकांचा (विश्वाचा) स्वामी आहे, तो सर्वोत्तम, सर्वोच्च, पवित्र करणारा पुरुष आहे आणि सदैव बरोबर राहणारा आहे.

*तीन लोक :* मृत्यूलोक (भूलोक ते पाताळ लोकापर्यंत), अंतरिक्ष (भुवर्लोक) आणि स्वर्गलोक (स्वर्गलोक ते सत्यलोकापर्यंत)

**यज्ञ तप ध्यान योग ही त्याग,**
**वन कुटी वास अति वैराग।**
**राम – नाम बिना नीरस फोक,**
**राम – राम जप तरिए लोक॥३०॥**

यज्ञ, तपस्या, ध्यान, त्याग, प्रभू–प्राप्तीची सर्व

साधने, जंगलात झोपडी बांधून तेथे राहणे, उच्चतम वैराग्य, या सर्व क्रिया राम–नामाशिवाय रसहीन, फिक्या आहेत. म्हणून राम–राम असा जप करा आणि संसार–सागर तरुन जा.

*यज्ञ :* जे कर्म केल्याने पर–हित होते तसेच आपले कल्याण होते.

*तप :* आध्यात्मिक प्रगतीसाठी कष्ट करणे, जे सहन होईल असे, म्हणजे तप.

*ध्यान :* संसारातून मनोवृत्ती काढून नामावर स्थिर करणे.

*त्याग :* विकार, विषयासक्ती यापासून सुटका होणे.

यज्ञ, दान आणि तप ही साधकाला पवित्र करणारी कर्मे होत. त्याग या शब्दाचा दान असाही अर्थ होतो. अहंकार आणि फलेच्छा यांचा त्याग करून उपयुक्त

वस्तूंचे समर्पण यालाच दान किंवा त्याग म्हणतात.

*वैराग्य* : इहलोक आणि परलोक येथील विषयांसंबंधी सुखांची पूर्णपणे उपेक्षा करणे म्हणजेच वैराग्य होय.

**राम - जाप सब संयम साधन,**
**राम - जाप है कर्म आराधन।**
**राम - जाप है परम - अभ्यास,**
**सिमरो राम - नाम 'सुख-रास' ।।३१।।**

संयम—मन आणि इंद्रिये यांचे नियमन करण्याची सर्व साधने राम—जप करण्यात समाविष्ट आहेत म्हणजेच संयमासाठी नाम—जप एवढा एकच अभ्यास पुरेसा आहे. परमेश्वराची आराधना करण्यासाठी करावी लागणारी सर्व कर्मे सुद्धा राम—जपामध्ये सामावलेली आहेत. राम—जप ही सर्वोत्तम (संपूर्ण) साधना आहे. म्हणून सुखाचा ठेवा (सुख—संग्रह) असे राम—नामाचे स्मरण करा.

*संयम :* एकाच ध्येयावर धारणा, ध्यान आणि समाधी लावणे हे संयमाचे साधन आहे.

*अभ्यास :* जप, ध्यान इ. पुनः पुन्हा, नेहमी, निरंतर करीत राहणे हा अभ्यास आहे.

*आराधन :* प्रभूचा महिमा, त्याच्या गुणांचे गायन करणे.

**राम - जाप कही ऊँची करणी,**
**बाधा - विघ्न बहु दु:ख हरणी।**
**राम - राम महा-मंत्र जपना,**
**है सुव्रत नेम तप तपना ।।३२।।**

राम–जप हे एक अलौकिक कर्म, उच्च कर्म म्हटले जाते, हे अडचणी, अडथळे, संकटे तसेच दु:खाचा डोंगर दूर करणारे आहे. महान–मंत्र, राम–राम असा जप करणे एक पुण्यप्रद–शपथ आहे, एक चांगला नियम आणि उच्च कोटीचे ते तप आहे.

*सुव्रत :* राम–नामाचा जप सर्व ठिकाणी, सर्वकाळी आणि कोणतीही अवस्था असताना करणे यास सुव्रत म्हटले आहे.

**राम - जाप है सरल - समाधि,**
**हरे सब आधि व्याधि उपाधि।**
**ऋद्धि-सिद्धि और नव - निधान,**
**दाता राम है सब सुख - खान।।३३।।**

राम–जप ही एक सहज समाधी आहे. तसेच हे सर्व शारीरिक, मानसिक–रोग आणि (खोटे–नाटे) आरोप व दैवी संकटे दूर करणारे आहे. आध्यात्मिक शक्ती आणि नऊ प्रकारच्या संपत्तीचा दाता तसेच सर्व सुखांची खाण–खजिना म्हणजेच– राम.

*ऋद्धि–सिद्धी :* समृद्धि, सफलता–अष्ट (महा) सिद्धी.

**राम - राम चिन्तन सुविचार,**
**राम - राम जप निश्चय धार।**
**राम - राम श्री राम - ध्याना,**
**है परम - पद अमृत पाना ।।३४।।**

राम–राम या जपाचे ठिकाणी चित्त स्थिर करणे हा एक सुंदर विचार आहे म्हणजेच राम–नाम हा कायमचा एकच विचार असणे, सदैव भगवद्–विचारांचे स्फुरण होणे ही एक उदात्त स्थिती आहे, म्हणून दृढ निश्चयपूर्वक राम–राम हा जप करा. राम–राम श्रीरामाचे ध्यान करण्याचे हे तात्पर्य आहे की उच्चतम धाम–अवस्था रूपी अमृताची प्राप्ती करून घेणे.

*परम–पद :* ब्रह्मधाम. जेथे सूर्य, चंद्र व अग्नी प्रकाशत नाहीत, जे स्वत: प्रकाशमान आहे. जिथे गेल्यानंतर जीव पुन्हा परत येत नाही, ते परम–धाम होय. जेथे नेहमी परमानंद आहे, जे स्थान दु:ख, शोक, म्हातारपण, मृत्यु याविरहित आहे, तेच परम–पद आहे.

**राम - राम श्री राम हरि,**
**सहज परम है योग।**
**राम - राम श्री राम - जप,**
**दाता अमृत - भोग।।३५।।**

राम–राम श्री राम (हरि–नाम) प्रभूशी जोडणारे सर्वोत्तम तसेच सुलभ असे साधन आहे. म्हणून राम–राम हा श्रीरामांचा जप करा, ज्याचे सेवन अमृत प्राप्त करून देणारे आहे.

**नाम चिन्तामणि रत्न अमोल,**
**राम - नाम महिमा अनमोल।**
**अतुल प्रभाव अति - प्रताप,**
**राम - नाम कहा तारक जाप।।३६।।**

राम–नाम रूपी चिंतामणी हे असे एक रत्न आहे की ज्याची किंमत–मूल्य करता येत नाही म्हणजेच ते अमूल्य आहे. राम–नामाची महत्ता मौल्यवान आहे,

त्याच्या प्रभावाची तुलना होत नाही आणि ते अतिशय शक्तीशाली आहे. राम–नाम तर उद्धार करणारा जप आहे, म्हणजेच तो जप मुक्ती प्रदान करणारा आहे.

**बीज अक्षर महा–शक्ति–कोष,**
**राम - राम जप शुभ–सन्तोष।**
**राम - राम श्री राम - राम मंत्र,**
**तंत्र बीज परात्पर यंत्र ।।३७।।**

राम–नामाचे मूळ अक्षर महान शक्तीचा स्त्रोत (खाण) आहे, राम–राम हा जप शुभ–संतोषकारी आहे, संतोष प्रदान करून धन्य करणारा आहे. राम–राम श्रीराम हा मंत्र तांत्रिक विद्येचाही मूळ आहे आणि सर्वोत्कृष्ट असे रक्षण करणारे कवच आहे, यापेक्षा अधिक श्रेष्ठ कोणतेही तंत्र–यंत्र नाही म्हणजेच राम–मंत्र तंत्रही आहे आणि ते उच्चतर यंत्रसुद्धा आहे. राम दरबारातून जे प्राप्त होऊ शकले नाही ते आणखी दुसऱ्या ठिकाणी पण मिळू शकणार नाही.

*तंत्र* : तांत्रिक विद्येचे सिद्धांत, मंत्र साधनेचे विशेष विधी.

*यंत्र* : ताईत, सिद्ध मंत्राच्या द्वारा कार्य सिद्ध करण्याची पद्धत, अष्टदल कमल इ. विविध चक्राकृती.

**बीजाक्षर पद पद्म प्रकाशे,**
**राम - राम जप दोष विनाशे।**
**कुण्डलिनी बोधे सुषुम्ना खोले,**
**राम - मंत्र अमृत - रस घोले ।।३८।।**

हा मूळ–मंत्र आत स्थित असलेल्या कमल–चक्रांना क्रमश: उमलवितो. राम–राम ह्या नामाचा जप दोष–दुर्गुण नाहीसे करतो. कुंडलिनी शक्तीला उर्ध्वगामी–जागृत करतो तसेच सुषुम्ना नाडी उघडी करतो. राम–मंत्र अंत:करणामध्ये अमृतरूपी रस मिसळतो– अमृतरस भरतो.

*कुंडलिनी* : सर्पाच्या आकाराची सुषुप्त

(निद्रित) शक्ती की जी सगळ्यात खाली स्थित मूलाधार चक्रामध्ये वास करते.

*सुषुम्ना :* कमलाच्या नालीत (देठ), इंगळा-पिंगला या दोन नाड्यांच्यामध्ये स्थित असणारी मध्य-नाडी. याच्यामध्येच जागृत झालेली कुंडलिनी वरच्या चक्रांकडे गमन करते.

**उपजे नाद सहज बहु - भांत,**
**अजपा जाप भीतर हो शान्त।**
**राम - राम पद शक्ति जगावे,**
**राम - राम धुन जभी रमावे ॥३९॥**

अनेक प्रकारचे दिव्य ध्वनी सहजपणे उत्पन्न होतात. अंतरंग शांत करणारा, कोणत्याही प्रकारे प्रयत्न न करता निरंतर होणारा जप सुरू होतो. मन जेव्हा राम-राम ह्या मधुर धुनीत रममाण होते तेव्हा राम-राम हे पद अंतरंग शक्तिंना जागृत करते.

*नाद* : समाधी अवस्थेमध्ये ऐकू येणारा सूक्ष्म शब्द.

**राम - नाम जब जगे अभंग,**
**चेतन - भाव जगे सुख-संग।**
**ग्रन्थी अविद्या टूटे भारी,**
**राम - लीला की खिले फुलवारी।।४०।।**

राम-नाम हे जेव्हा अखंडपणे अंतरंगात गुंजन करते, जागृत असते तेव्हा ''मी आत्मा आहे'' अशी चैतन्य भावना परमानंदपूर्वक-सुख सहित जागृत होते आणि अविद्येची ग्रंथी (गांठ)- ''मी देह आहे'' ही सोडली जाते म्हणजेच राम-नामाच्या प्रकाशाने अज्ञानाचा अंधकार दूर होतो, तेव्हा राम-लीला रचनारूपी फुले उमलतात.

**पतित - पावन परम - पाठ,**
**राम - राम जप याग।**
**सफल सिद्धि कर साधना,**
**राम - नाम अनुराग।।४१।।**

राम–राम वारंवार म्हणणे हा जप–यज्ञ होय. हा यज्ञ पतितांना पवित्र करणारा आहे तसेच परम–अध्ययन (सर्वोच्च पाठ्य–सामग्री) आहे. राम–नामात असलेले प्रेम, साधना सफलता पूर्वक संपन्न करते.

**तीन लोक का समझिए सार,**
**राम - नाम सब ही सुखकार।**
**राम - नाम की बहुत बड़ाई,**
**वेद पुराण मुनि जन गाई।।४२।।**

सुख प्रदान करणारे हे राम–नाम सगळ्या विश्वाचा आत्मा आहे, तत्त्व आहे, हे समजून घ्या. राम–नामाचे माहात्म्य, याचा प्रताप तर वेद, पुराणे

तसेच मुनींनी मुक्तपणे भरपूर गाईला आहे.

*तीन लोक का सार :* ''रँ'' अग्निबीज (अग्नीचे भूलोक हे स्थान आहे), ''अँ'' आदित्य बीज (सूर्याचे स्वर्गलोक हे स्थान आहे) ''मँ'' चंद्रबीज (दोन्हीच्या मध्ये अंतरिक्ष लोक हे चंद्राचे स्थान आहे) अशा प्रकारे राम-नाम हे तिन्ही लोकांचे सार आहे.

*मुनि :* मनन करण्यात जो मग्न असतो तो.

**यति सती साधु-संत सयाने,**
**राम - नाम निश - दिन बखाने।**
**तापस योगी सिद्ध ऋषिवर,**
**जपते राम - राम सब सुखकर।।४३।।**

यती, पतीव्रता-साध्वी, साधु-संत तसेच बुद्धिमान लोक असे सर्वजण रात्रं-दिवस राम-नामाचे गुणगान करतात. तपस्वी, योगी, सिद्ध आणि ऋषी-

महर्षी असे सर्वजण, सर्व सुखांचा दाता असणारा राम–राम असा जप करतात.

(यती : इंद्रिये व मन यांचे दमन करणारा.)

(सती : पतिव्रता.)

(सिद्ध : ज्याने आध्यात्मिक शक्ती प्राप्त केली आहे असा.)

**भावना भक्ति भरे भजनीक,**
**भजते राम - नाम रमणीक।**
**भजते भक्त भाव - भरपूर,**
**भ्रम - भय भेद–भाव से दूर।।४४।।**

श्रद्धेने आणि भक्तीने परिपूर्ण असे भजन म्हणणारे गायक–भक्त अतिशय सुंदर अशा राम–नामाला भजतात. भक्त हे भावपूर्ण, प्रेमपूर्वक भजन–गुणगानाद्वारे संशय, भय आणि पक्षपात यांपासून दूर राहतात.

**पूर्ण पंडित पुरुष - प्रधान,**
**पावन - परम ·पाठ ही मान।**
**करते राम - राम जप - ध्यान,**
**सुनते राम अनाहद - तान।।४५।।**

खरा विद्वान, लोकनेते यांना हा पाठ परम-पवित्र तसेच पवित्र करणारा आहे असे समजून राम-राम हा जप नित्य करतात तसेच ध्यान करतात आणि अंतरात 'राम' शब्दाचा सूक्ष्म-दिव्य ध्वनी ऐकून आनंदविभोर होतात.

*अनाहद तान :* जिभेच्या टोकावर प्रकट होणारी वाणी वैखरी म्हटली जाते, कंठातील मध्यमा, हृदयातील पश्यंती आणि नाभी स्थानी प्रकट होणारी परा-वाणी म्हटली जाते. पश्यंतीच्या नादाला अनहत किंवा अनाहत नाद म्हणतात. अजपा-जप मध्ये हा नाद चालतो.

**इस में सुरति सुर रमाते,**
**राम - राम स्वर साध समाते।**
**देव देवीगण दैव विधाता,**
**राम - राम भजते गणत्राता ।।४६।।**

राम–नाम ध्वनीचा नाद ऐकून प्रेमीजन–अनुरक्तजन, देवता आणि साधू तल्लीनता प्राप्त करून घेतात, स्वत:ला विसरून जातात, आनंदमग्न होतात. राम–नामाला तर देवता, देवी, दिव्य लोकात वास करणारे, विश्वाचा सृष्टीकर्ता आणि जनांचे रक्षण करणारे असे सर्वजण भजतात म्हणजेच वैष्णव, शैव, शाक्त आपआपल्या इष्ट देवतेसह सर्वजण राम–राम असे भजन करतात.

सुर : इंद्र इ. देवता.
देव : ब्रह्मा, शिव इ. देवता.
देवीगण : सरस्वती, लक्ष्मी, पार्वती.
दैव : दिव्य लोकात निवास करणारे.

विधाता : सृष्टीकर्ता.

गणत्राता : शिव, विष्णू, शक्ती, गणपती इ.

**राम - राम सुगुणी जन गाते,**
**स्वर - संगीत से राम रिझाते।**
**कीर्तन - कथा करते विद्वान,**
**सार सरस संग साधनवान्॥४७॥**

चांगल्या गुणवान व्यक्ती राम-राम गातात. आपल्या मधुर स्वरांनी, सुंदर गीतांनी रामाला प्रसन्न करतात. शिकलेले-शास्त्रज्ञ तसेच साधक रामाच्या कीर्तीचे गायन करतात, त्यांचा उपदेश, त्यांची तत्त्वासह मधुर चर्चा करतात.

**मोहक मंत्र अति मधुर,**
**राम - राम जप ध्यान।**
**होता तीनों लोक में,**
**राम - नाम गुण - गान॥४८॥**

राम–राम ह्या नामाचा उच्चार (जप) तसेच ध्यान अत्यंत मधुर आणि आकर्षक–मनाला मुग्ध करणारा मंत्र आहे. तिन्ही लोकात याचे गुण–गान, यशोगान होत असते.

**मिथ्या मन–कल्पित मत–जाल,**
**मिथ्या है मोह – कुमद – बैताल।**
**मिथ्या मन – मुखिया – मनोराज,**
**सच्चा है राम – नाम जप काज।।४९।।**

मनाने रचलेले, मनाने कल्पना केलेले असे वेग–वेगळे पंथ असत् आहेत– नश्वर आहेत. मोह, अहंकारजनित भूत हे सुद्धा असत् आहे. मनाला प्राधान्य देणे, मनाच्या द्वारे अनुशासित– नियंत्रित होणे म्हणजे मनोराज्यात राहणे हे सुद्धा मिथ्या आहे. राम–नाम जपरूपी कार्य तेवढेच सत्य आहे.

**मिथ्या है वाद - विवाद विरोध,**
**मिथ्या है वैर निंदा हठ क्रोध।**
**मिथ्या द्रोह दुर्गुण दुःख खान,**
**राम - नाम जप सत्य निधान।।५०।।**

खंडन-मंडन (दुसऱ्याचे मत खोडणे, अनुमोदन देणे), अनाठायी तर्क-वितर्क आणि प्रतिकूलता हे सर्व असत् आहे. शत्रूता, दुसऱ्याच्या दोषांचे वर्णन, दुराग्रह, क्रोध, दुष्ट भावना, वाईट गुण मिथ्या तसेच दुःखाची ठिकाणे होत. फक्त राम-नाम जपच सत्याचे भांडार आहे.

**सत्य - मूलक है रचना सारी,**
**सर्व - सत्य प्रभु - राम पसारी।**
**बीज से तरु मकड़ी से तार,**
**हुआ त्यों राम से जग विस्तार।।५१।।**

सगळ्या सृष्टीच्या मुळाशी सत्य आहे. सर्व

सत्यांचा सत्य प्रभू रामद्वारा ही सृष्टी विस्तार पावली आहे, म्हणजेच प्रभू रामांनी हिला फैलावले आहे. जसे बीजापासून वृक्ष आणि कोळ्याने तयार केलेले तंतूंच जाळे, तसेच रामाच्या द्वारे सगळ्या विश्वाचा विस्तार झाला आहे.

**विश्व - वृक्ष का राम है मूल,**
**उस को तू प्राणी कभी न भूल।**
**साँस - साँस से सिमर सुजान,**
**राम - राम प्रभु - राम महान्॥५२॥**

विश्व–रूपी वृक्षाचे आद्य, पहिले मूळ (बीज) राम आहे. हे प्राण्या ! ह्या तथ्याला (सत्याला) तू कधीही विसरू नकोस, म्हणून हे बुद्धीजीवा ! तू प्रत्येक श्वासोच्छ्वासाबरोबर त्या महान प्रभूचे स्मरण कर, त्याची आठवण ठेव.

**लय उत्पत्ति पालना - रूप,**
**शक्ति - चेतना आनंद - स्वरूप।**
**आदि अन्त और मध्य है राम,**
**अशरण-शरण है राम-विश्राम ।।५३।।**

ज्यांना कोणाचा आश्रय नाही त्यांचा राम आश्रय आहे, त्यांना शरण जाण्याने तो विश्राम देणारा आहे, तो विध्वंस, सृष्टी तसेच पालन-कर्ता असा आहे, तसेच परा-शक्ती, ज्ञान व आनंद-सच्चिदानंद हाच ज्याचा स्वभाव आहे तोच राम सृष्टीचा प्रारंभ, मध्य आणि अंत आहे.

**राम - नाम जप भाव से,**
**मेरे अपने आप।**
**परम - पुरुष पालक-प्रभु,**
**हर्ता पाप त्रिताप ।।५४।।**

अत: हे माझ्या, तू स्वत: ! तू प्रेमाने अत्यंत भावनायुक्त अंत:करणाने राम-नामाचा जप कर. राम

तर पुरुषोत्तम आहे, स्वामी आहे, सर्वांचे पालन करणारा आणि सर्व पापांचा समुच्चय त्याचबरोबर तिन्ही ताप नाहीसे करणारा– त्यांचा विध्वंस करणारा आहे.

**राम – नाम बिना वृथा विहार,**
**धन – ध्यान सुख – भोग पसार।**
**वृथा है सब सम्पद् सम्मान,**
**होवे तन यथा रहित प्राण ।।५५।।**

सर्व प्रकारांनी होणारे मनोरंजन, भोग आणि भोग–सामग्री, धन–धान्य (अन्न), अनेक प्रकारची सुखे व त्यांचा विस्तार, राम–नामाखेरीज निरर्थक, नीरस आहे. सगळे ऐश्वर्य, मान–सन्मान सुद्धा व्यर्थ आहे, जसे प्राणाशिवाय शरीर !

**नाम बिना सब नीरस स्वाद,**
**ज्यों हो स्वर बिना राग विषाद।**
**नाम बिना नहीं सजे सिंगार,**
**राम–नाम है सब रस सार।।५६।।**

चांगल्या स्वरांखेरीज जसे संगीत तसेच रामनामाखेरीज बाकी सर्व स्वाद रसहीन होत. ते संगीत उदासीन करणारे, अप्रिय होय. नामाशिवाय शृंगार (सजावट) सुद्धा आकर्षित करीत नाही, प्रभावहीन असतो. राम–नामच सर्व स्वादांचा रस, प्राण आहे.

**जगत् का जीवन जानो राम,**
**जग की ज्योति जाज्वल्यमान।**
**राम – नाम बिना मोहिनी – माया,**
**जीवन–हीन यथा तन – छाया।।५७।।**

सगळ्या विश्वाचा आत्मा राम आहे, हे समजावून घे, (विश्वात्मा म्हणजेच सर्वात्मा), संसाराची झगमगणारी ज्योत 'राम' आहे. आणि ज्यामुळे सर्व सृष्टीचे कार्य चालते ती भ्रम निर्माण करणारी शक्ती–मायासुद्धा रामनामाखेरीज शून्यप्रद, निष्प्राण आहे जशी शरीराची असणारी सावली.

**सूना समझिए सब संसार,**
**जहाँ नहीं राम - नाम संचार।**
**सूना जानिए ज्ञान - विवेक,**
**जिस में राम - नाम नहीं एक ।।५८।।**

राम-नामाच्या व्याप्तीखेरीज सगळा संसार हा उजाड समजा. राम-नामाखेरीज असलेले ज्ञान, विवेक सुद्धा पोकळ उथळ आहे.

**सूने ग्रंथ पंथ मत पोथे,**
**बने जो राम - नाम बिन थोथे।**
**राम - नाम बिन वाद - विचार,**
**भारी भ्रम का करे प्रचार।।५९।।**

सर्व धर्म-ग्रंथ-शास्त्रे, संप्रदाय आणि धार्मिक सिद्धांत तसेच मोठ-मोठी पुस्तके राम-नामाशिवाय रद्दीतच गणली पाहिजेत. चर्चा, तर्क, चिंतन राम-नामाशिवाय असेल तर ते मोठ्या भ्रांती

(Confusion) चाच प्रचार करतील.

**राम - नाम दीपक बिना,**
**जन-मन में अन्धेर।**
**रहे, इस से हे मम-मन,**
**नाम सुमाला फेर।।६०।।**

राम-नामरूपी दिव्याशिवाय मनात अंधारच व्यापून असतो. म्हणून माझ्या मना ! तू राम नामाची सुंदर माळ जप.

**राम - राम भज कर श्री राम,**
**करिए नित्य ही उत्तम काम।**
**जितने कर्तव्य कर्म कलाप,**
**करिए राम - राम कर जाप।।६१।।**

राम-राम, श्री रामाचा उच्चार त्याचे गुणगान करीत नेहमीच श्रेष्ठ कर्म-सुकृत-सत्कर्म करा. राम-

नाम जप, आराधना, स्मरण, चिंतन, ध्यान हेच तर सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम कर्म होय. म्हणून अशी सर्वोच्च कर्मे नेहमी करीत रहा आणि सर्व कर्तव्ये, कर्म, व्यापार–उद्योग, काम–धंदा करीत करीत 'राम–राम' जप करीत रहा. असे म्हणण्याचा उद्देश्य असा की 'मुखा मध्ये राम–राम आणि हाताने योग्य ते काम.'

**करिए गमनागम के काल,**
**राम - जाप जो करता निहाल।**
**सोते जगते सब दिन याम,**
**जपिए राम - राम अभिराम।।६२।।**

येता–जाताना सुद्धा राम–नाम जप करीत रहा, हा संतुष्ट आणि प्रसन्न करणारा आहे. झोपेत, जागेपणी, सतत, दिवस–रात्र, अष्टौप्रहार, नित्य–सुंदर–मनोहर असा राम–राम जप करा.

**जपते राम - नाम महा - माला,**
**लगता नरक - द्वार पै ताला।**
**जपते राम - राम जप पाठ,**
**जलते कर्मबन्ध यथा काठ ।।६३।।**

राम-नाम महामंत्राची माळ करीत गेल्याने नरकाच्या दाराला कुलूप लागते म्हणजेच राम नामाचा जप करणारा भक्त नरकात जात नाही, उलट राम-राम जपाने, पुनरावृत्तीने, कर्मामुळे निर्माण झालेले बंधन असे जळून जातात- जसे लाकूड.

*बंधन :* स्वार्थ, अहंकार, द्वेष, ईर्ष्या यांनी प्रेरीत होऊन केलेली कर्मे बंधनकारक होतात.

**तान जब राम - नाम की टूटे,**
**भांडा - भरा अभाग्य भय फूटे।**
**मनका है राम - नाम का ऐसा,**
**चिन्ता-मणि पारस-मणि जैसा।।६४।।**

राम–नामाची धून जेव्हा नेहमी अंत:करणात घुमत राहते, तेव्हा भीती आणि दुर्भाग्य यांनी भरलेले भांडे तुटून–फुटून जाते, त्याचे तुकडे–तुकडे होतात. राम–नामाचा मणी (Bead) चिंतामणी, परीसा सारखा होय.

पारस–मणि : ज्याच्या स्पर्शानेच केवळ लोखंडाचे सोने होते असा अमूल्य पाषाण.

**राम - नाम सुधा–रस सागर,**
**राम - नाम ज्ञान गुण–आगर।**
**राम - नाम श्री राम–महाराज,**
**भव - सिन्धु में है अतुल–जहाज ।।६५।।**

राम–नाम हे अमृताचा सागर आहे. राम–नाम हे आत्म–विद्येचे तसेच सद्गुणांचे कधीही न संपणारे असे भांडार आहे. राम–नाम, श्रीराम महाराज–महान स्वामी आणि संसार रूपी सागर पार करविणारे अद्वितीय असे जहाज आहे.

**राम - नाम सब तीर्थ - स्थान,**
**राम - राम जप परम - स्थान।**
**धो कर पाप-ताप सब धूल,**
**कर दे भय-भ्रम को उन्मूल।।६६।।**

राम-नामामध्ये सर्व तीर्थस्थाने सामावलेली आहेत, राम-राम असा जप अंतर्बाह्य शुद्ध करणारे सर्वोत्तम असे स्नान आहे. पाप आणि तापाची आत्म्यावर बसलेली धूळ तो जप धुवून टाकून, भय, संशय, भ्रांती यांना मुळापासून उखडून फेकून देतो.

**राम - जाप रवि-तेज समान,**
**महा - मोह-तम हरे अज्ञान।**
**राम - जाप दे आनन्द महान्,**
**मिले उसे जिसे दे भगवान्।।६७।।**

राम-जप हा सूर्याच्या प्रकाशासारखा तेजस्वी

आहे, तो मोह आणि अज्ञान यांचा घोर अंध:कार दूर करतो. वास्तविक पाहता राम-जप अत्याधिक आनंद (परमानंद) देतो पण हा आनंद त्यालाच मिळतो ज्याला भगवान स्वत: तो देतात.

**राम - नाम को सिमरिये,**
**राम - राम एक तार।**
**परम - पाठ पावन - परम,**
**पतित अधम दे तार ।।६८।।**

राम-नामाचे अखंड स्मरण करा, विश्रांती न घेता, अखंड राम-राम-राम असे स्मरण करा. हा उच्चतम पाठ (**Lesson**) आहे, तो सर्वात अधिक पवित्र करणारा आहे तसेच नीचातला नीच पापी, अति दुष्ट यांचा सुद्धा उद्धार करणारा आहे.

**माँगूं मैं राम-कृपा दिन रात,**
**राम-कृपा हरे सब उत्पात।**
**राम-कृपा लेवे अन्त सम्भाल,**
**राम - प्रभु है जन प्रतिपाल।।६९।।**

मी रात्रंदिवस राम-कृपाच मागतो कारण रामकृपा सर्व अनर्थ, दुर्दशा, उलथा-पालथ (विपर्यास) यांच्यापासून बचाव करते, राम-कृपा अंतकाळी रक्षण करते. राम-प्रभू तर सर्वांचा प्रतिपाळ करणारे रक्षक आहेत.

**राम-कृपा है उच्चतर - योग,**
**राम-कृपा है शुभ संयोग।**
**राम-कृपा सब साधन-मर्म,**
**राम-कृपा संयम सत्य धर्म।।७०।।**

राम-कृपा होणे हा सर्वोच्च योग आहे. राम-कृपा हे परम सौभाग्य, उत्तम संधी, दैव-योग आहे.

राम–कृपा हे सर्व आध्यात्मिक साधने, अभ्यास यांचे रहस्य आहे, गोपनीय असे तत्त्व आहे. खरे पाहता राम–कृपा म्हणजेच इंद्रिय–दमन, मनोनिग्रह आणि खराखुरा धर्म आहे.

**राम – नाम को मन में बसाना,**
**सुपथ राम – कृपा का है पाना।**
**मन में राम–धुन जब फिरे,**
**राम – कृपा तब ही अवतरे।।७१।।**

मनामध्ये राम–नाम बसविणे (स्थिर करणे) हा राम–कृपा प्राप्तीचा सुंदर मार्ग–साधन आहे. राम–धुन जेव्हा मनात झंकार करते, गूंजन करते तेव्हाच राम–कृपा प्राप्त होते.

*धुन :* राम–नाम सुर–तालासह अंतरंगात चालू राहणे, ध्वनी तसेच प्रतिध्वनी.

**रहूँ मैं नाम में हो कर लीन,**
**जैसे जल में हो मीन अदीन।**
**राम-कृपा भरपूर मैं पाऊँ,**
**परम प्रभु को भीतर लाऊँ ।।७२।।**

मासा ज्याप्रमाणे पाण्यात निर्भय होऊन स्वच्छंदपणे विहार करतो त्याचप्रमाणे मी राम-नामात निमग्न होऊन राहीन. मी मोठ्या प्रमाणात राम-कृपा प्राप्त करीन आणि माझ्या प्रियतम स्वामीला अंतरंगात प्रगट करीन म्हणजेच राम आणि राम-कृपा एकमेकांपासून अभिन्न आहेत.

**भक्ति - भाव से भक्त सुजान,**
**भजते राम-कृपा का निधान।**
**राम-कृपा उस जन में आवे,**
**जिस में आप ही राम बसावे ।।७३।।**

बुद्धिमान श्रद्धाळू भक्त अत्यंत प्रेमाने, भक्तीची

भावना करून कृपेचा खजीनाच जणू अशा रामाला भजतात. राम–कृपा त्याच भक्तावर अवतीर्ण होते. ज्याच्यावर स्वत: राम कृपेचा वर्षाव करतात.

**कृपा–प्रसाद है राम की देनी,**
**काल–व्याल जंजाल हर लेनी**
**कृपा–प्रसाद सुधा–सुख–स्वाद,**
**राम - नाम दे रहित विवाद।।७४।।**

राम–रूपी प्रसाद म्हणजे तर रामाने दिलेली भेटवस्तूच होय. ही भेट म्हणजे काळ–रूपी सर्पाने–नागाने वेढलेल्या विळख्यामुळे होणाऱ्या वेदनेपासून सुटका करून देणारी आहे. रामाचे नाव हे नि:संदेह, निर्विवादपणे कृपा–रूपी प्रसादाच्या द्वारे अमृत–सुखाचा स्वादच देते.

**प्रभु-प्रसाद शिव-शान्ति-दाता,**
**ब्रह्म-धाम में आप पहुँचाता।**
**प्रभु-प्रसाद पावे वह प्राणी,**
**राम - राम जपे अमृत - वाणी।।७५।।**

प्रभूने दिलेला कृपारूपी प्रसाद म्हणजेच प्रभूची प्रसन्नता, मंगलकारक तसेच शांती देणारी आहे. प्रसाद तर तो स्वत:च ब्रह्म-धामात घेऊन जातो. हा प्रसाद म्हणजे त्याच मनुष्याला प्राप्त होतो, जो राम-राम रूपी दिव्य शब्दाचा नेहमी उच्चार करतो.

**औषध राम - नाम की खाइये,**
**मृत्यु जन्म के रोग मिटाइये।**
**राम - नाम अमृत रस - पान,**
**देता अमल अचल निर्वाण।।७६।।**

राम-नामरूपी औषधीचे सेवन करा आणि जन्म-मरण रूपी रोगातून मुक्त व्हा, तो रोग नष्ट करा. राम-नाम रूपी अमृताचे सेवन शुद्ध-सुस्पष्ट व

स्थिर असा मोक्ष प्रदान करते.

**राम - राम धुन गूँज से,**
**भव - भय जाते भाग।**
**राम - नाम धुन ध्यान से,**
**सब शुभ जाते जाग ।।७७।।**

राम-राम अशा ध्वनीच्या निर्माण होणाऱ्या प्रतीध्वनीमुळे जन्म-मरणाची भीती नाहीशी होते आणि राम-राम या ध्वनीवर लक्ष केंद्रित केल्याने, एकाग्रचित्त केल्याने, सर्व शुभ प्रगट होते, सौभाग्याचा उदय होतो.

**माँगूं मैं राम - नाम महादान,**
**करता निर्धन का कल्याण।**
**देव - द्वार पर जन्म का भूखा,**
**भक्ति प्रेम अनुराग से रूखा ।।७८।।**

मी राम-नामाचे विशिष्ट दान मागत आहे, प्रभू रामांना त्यांच्या मधुर नावाचे अतिमहान-उच्चतम असे दान मागतो. ते निर्धन, निर्बळ, दरिद्री माणसाचा

उद्धार, कल्याण करणारे आहे. अनेक जन्मांपासून मी भुकेलेला असून रामाच्या दारात उभा आहे, माझ्याजवळ ना भक्ती, ना प्रेम, ना श्रद्धा आणि अनुरक्ती तर मुळीच नाही.

**'पर हूँ तेरा'-यह लिये टेर,**
**चरण पड़े की रखियो मेर।**
**अपना आप विरद - विचार,**
**दीजिए भगवन् ! नाम प्यार।।७९।।**

परंतु अत्यंत करुणामय असे माझे मागणे आहे की, ''मी तुझा आहे,'' मी तुझ्या चरणांशी नतमस्तक झालो आहे, मला सांभाळ. माझ्यावर मेहेरनजर कर, कृपा कर, हे प्रभो ! माझ्या कमीपणाकडे लक्ष न देता तुम्ही आपले सामर्थ्य, आपला स्वभाव, आपले उच्च यश-कीर्ती यांचा विचार करून मला आपल्या नामाचे प्रेम द्या.

**राम - नाम ने वे भी तारे,**
**जो थे अधर्मी - अधम हत्यारे।**
**कपटी - कुटिल - कुकर्मी अनेक,**
**तर गये राम - नाम ले एक ।।८०।।**

राम–नामाने तर ते सर्वजण तारले गेले म्हणजेच जे धर्म–हीन, नास्तिक, नीच, खुनी, छळकपट करणारे, धोकेबाज, घृणा आणणारे–अश्लील असे वाईट कर्म करणारे अनेक पापी होते. त्यांनाही राम–नामाने तारले, ते सर्वजण एकमेव राम–नाम घेऊनच तरुन गेले.

**तर गये धृति - धारणा हीन,**
**धर्म–कर्म में जन अति दीन।**
**राम - राम श्री राम - जप जाप,**
**हुए अतुल - विमल - अपाप।।८१।।**

ज्यांचा दृढ–निश्चय नव्हता, जे अविश्वासी

होते, असहनशील होते, ज्यांचे मन अस्थिर असल्याने भगवंताच्या ठिकाणी एकाग्र होत नव्हते, अनैतिक कर्म करणारे म्हणजेच ज्यांची कर्मे धर्माला अनुकूल अशी नव्हती, असे धर्म–हीन, कर्म–हीन तुच्छ लोकसुद्धा राम–राम श्रीराम या नामाचा जप करून निष्पाप झाले, ते इतके पवित्र झाले की त्यांच्या पवित्रतेची तुलना करता येत नाही म्हणजेच ते एकदम अति निर्मल, पापरहीत असे झाले.

*धृति :* धैर्य–दृढ निश्चय–दृढ संकल्प (Steadiness)

**राम - नाम मन मुख में बोले,**
**राम - नाम भीतर पट खोले।**
**राम - नाम से कमल - विकास,**
**होवें सब साधन सुख–रास।।८२।।**

राम–नाम वाणीने तसेच मनातल्या मनात ते

घेतल्याने अंतरंगातील दारे उघडली जातात, अज्ञानाचा पडदा दूर होतो, तो फाटून जातो. राम–नामामुळे हृदयकमळ उमलते, विकसीत होते आणि साधना सुखकारक–आनंदमयी होते म्हणजेच सफल होते.

**राम – नाम घट भीतर बसे,**
**साँस – साँस नस – नस से रसे।**
**सपने में भी न बिसरे नाम,**
**राम–राम श्री राम – राम – राम ।।८३।।**

राम–नाम शरीर आणि मन यात स्थिर होते आणि श्वासोच्छ्वासातून, नाड्यामधून वाहू लागते म्हणजेच राम–नाम अंतरंगात असे खोलवर गेले पाहिजे की, प्रत्येक रोम, अंग आणि पेशी (Cell) यातून ते प्रवाहीत झाले पाहिजे, डोंगरावरून पाणी

खाली झेपावते अगदी तसेच ! मग स्वप्नातसुद्धा राम–राम–राम नाम नेहमी आठवते, नाम स्मरण नित्य होत राहते.

**राम - नाम के मेल से,**
**सध जाते सब - काम।**
**देव - देव देवे यदा,**
**दान महा - सुख धाम।।८४।।**

राम–नामाशी संयोग झाल्यामुळे सगळी कार्ये सिद्ध होतात, पूर्ण होतात. व्यक्ती धन्य होते, कृतकृत्य होते. ज्या आत्यंतिक सुखात कधीही कमतरता येत नाही असे ते धाम–भांडार, जेव्हा देवांचे देव प्रभू राम देतात, तेव्हा महादानाच्या रूपाने ते मिळते.

**अहो ! मैं राम - नाम धन पाया,**
**कान में राम - नाम जब आया।**
**मुख से राम - नाम जब गाया,**
**मन से राम - नाम जब ध्याया ॥८५॥**

मी किती भाग्यवान ! जेव्हा राम–नाम माझ्या कानात प्रविष्ट झाले, तेव्हापासून मी राम–नाम रूपी धन प्राप्त करून घेतले, जेव्हापासून मी मुखाने राम–नाम घेण्यास सुरुवात केली आणि जेव्हा पासून राम–नाम मंत्रावर माझे मन एकाग्र होऊ लागले, तेव्हापासून माझे ध्यान लागू लागले.

**पा कर राम–नाम धन–राशी,**
**घोर - अविद्या विपद् विनाशी।**
**बढ़ा जब राम - प्रेम का पूर,**
**संकट - संशय हो गये दूर ॥८६॥**

राम–नामाचा खजिना प्राप्त केल्यावर घोर अज्ञानामुळे (महाअज्ञान) उत्पन्न झालेले शिवाय (मला) दिले गेलेले महान दु:ख नाहीसे झाले. एकूणच, राम–नामरूपी संपत्ती प्राप्त झाल्यावर महाअज्ञान आणि महा–दु:खाचा समूळ नाश होतो. रामावरील प्रेमाने जसजसे हृदय भरून गेले तेव्हाच सर्व संकटे आणि संशय नाहीसे झाले. असे समजा की भगवद्प्रेमाचा जेव्हा पूर येतो तेव्हा तो सगळी संकटे, भ्रम आपल्याबरोबरच वाहून नेतो. अविद्येचा अंधार नाहीसा करणे व संकटांचा नाश यासाठी राम–नाम हा एक अचूक मंत्र आहे.

**राम - नाम जो जपे एक बेर,**
**उस के भीतर कोष - कुबेर।**
**दीन - दुखिया - दरिद्र - कंगाल,**
**राम - राम जप होवे निहाल।।८७।।**

एवढेच नव्हे तर जो कोणी फक्त एकदाच राम–नाम घेतो, त्याच्याजवळसुद्धा देवांचा खजिनदार कुबेर याच्याकडे असलेल्या संपत्तीइतकी संपत्ती साचते. राम–राम असा जप केल्याने अगदी गरीब, दयनीय, निर्धन–निर्बल, दुःखी, दरिद्री, व्यथित असलेला माणूस सुद्धा संतुष्ट, समृद्ध, वैभवशाली तसेच भाग्यवान होतो.

**हृदय राम - नाम से भरिए,**
**संचय राम - नाम धन करिए ।**
**घट में नाम मूर्ति धरिए,**
**पूजा अन्तर्मुख हो करिए ।।८८।।**

म्हणून राम–नामाने आपले हृदय परिपूर्ण करा, भरून टाका आणि राम–नाम रूपी धन साचवून ठेवा, त्याच खऱ्याखुऱ्या धनाचा संग्रह करा. राम–नाम रूपी मूर्ती आपल्या अंतःकरणात स्थापना करा तसेच

अंतर्मनाकडे लक्ष देऊन पूजा, आराधना करा. अंत:करणात, हृदयात असलेल्या प्रभू-रामाची उपासना करा.

**आँखे मूँद के सुनिए सितार,**
**राम - राम सुमधुर झंकार।**
**उस में मन का मेल मिलाओ,**
**राम - राम सुर में ही समाओ ।।८९।।**

अंत:करणात छेडली जाणारी वीणा, डोळे बंद करून, राम-नामाचा मधुर झंकार, गूंजन, ध्वनी ऐका म्हणजेच अंत:करणात वाजणारे अति मधुर असे राम-राम गूंजन त्या वीणेचे स्वर डोळे बंद करून ऐका, मनाशी स्वराची गाठ घालून द्या आणि अशा प्रकारे राम-राम नामाची धुन ऐकता ऐकता त्या लयीत मिसळून जा, स्वत:ला विसरून जा.

**जपूँ मैं राम - राम प्रभु, राम,**
**ध्याऊँ मैं राम - राम हरे राम।**
**सिमरूँ मैं राम - राम प्रभु राम,**
**गाऊँ मैं राम - राम श्री राम ॥९०॥**

अरे रामा ! मी सदैव राम–नामाचाच जप करावा. हे प्रभू ! मी नेहमी राम–राम नामाकडेच ध्यान लावावे. हे हरि ! हे स्वामी ! मी सदा राम–राम नामाचेच स्मरण करावे व सदैव राम–राम श्रीराम याचेच गायन करावे.

**अमृतवाणी का नित्य गाना,**
**राम - राम मन बीच रमाना।**
**देता संकट - विपद् निवार,**
**करता शुभ श्री मंगलाचार॥९१॥**

या दिव्य, अमर करणाऱ्या वाणीचे नेहमी कीर्तन व संकीर्तन करावयाचा अभिप्राय असा की आपल्या

मनोमंदिरात राम–राम नाम स्थिर करणे. याचा नित्य पाठ दुःख, संकटे येण्याला अडथळे निर्माण करतो, विरोध करतो, त्याचबरोबर सौभाग्य, वैभव, ऐश्वर्य, सुख देणारा असा मंगलमय आहे, या सर्वांचा तो शुभारंभ होय.

**राम – नाम जप – पाठ से,**
**हो अमृत संचार।**
**राम – धाम में प्रीति हो,**
**सुगुण – गुण का विस्तार ।।९२।।**

राम–नामाचा जप आणि संकीर्तन, गुणगान केल्याने अमृतत्वाचा (माधुर्याचा) संचार होतो म्हणजेच ते मधुरता जागविते आणि त्याची व्याप्ती वाढविते, यामुळे राम आणि त्यांचे निवास–स्थान (राम–धाम) याविषयी प्रेम निर्माण होते आणि सद्गुणांचा समूह विस्तार पावतो. चांगल्या चांगल्या दिव्य गुणांची वाढ होते.

**तारक - मंत्र राम है,**
**जिस का सुफल अपार।**
**इस मंत्र के जाप से,**
**निश्चय बने निस्तार।।९३।।**

राम मंत्र हा तारणारा आहे, उद्धार करणारा आहे, बंधमुक्त करणारा आहे, तो असंख्य लाभ, सुख-भोग, सफलता, सिद्धी प्रदान करणारा असून आनंद उपभोगावयास लावणारा आहे. या मंत्राच्या जपामुळे मुक्ती (मोक्ष), निर्वाण पद-प्राप्ती, राम-धामाची प्राप्ती, भगवद्साक्षात्कार, परम-पदाची प्राप्ती, आत्मा व परमात्मा यांचे मिलन, एकरूपता एवढे लाभ प्राप्त होणारच असा पूर्ण विश्वास ठेवा.

*** इति ***

# धुन



१. बोलो राम, बोलो राम, बोलो राम राम राम।
२. श्री राम, श्री राम, श्री राम राम राम।
३. जय जय राम, जय जय राम, जय जय राम राम राम।
४. जय राम जय राम, जय जय राम,
राम राम राम राम, जय जय राम।
५. पतित पावन नाम, भज ले राम राम राम।
भज ले राम राम राम , भज ले राम राम राम ।।
६. अशरण शरण शान्ति के धाम,
मुझे भरोसा तेरा राम।
मुझे भरोसा तेरा राम,
मुझे भरोसा तेरा राम ।।
७. रामाय नम: श्री रामाय नम:
रामाय नम: श्री रामाय नम: ।
८. अहं भजामि रामं, सत्यं शिवं मंगलम् ।
सत्यं शिवं मंगलम्, सत्यं शिवं मंगलम् ।।

* * * * * * *

**वृद्धि-आस्तिक भाव की, शुभ मंगल संचार।**
**अभ्युदय सद्धर्म का, राम नाम विस्तार।।**

**: परमेश्वर श्रीरामाला निष्काम प्रार्थना :**

सर्व विश्वामध्ये ईश्वराबद्दल आपुलकी तसेच ईश्वरीय ज्ञानाबद्दल श्रद्धा-विश्वास वाढो, विश्वामध्ये शुभ आणि मंगल व्यापून राहो. खऱ्या धर्माचा उदय होवो आणि राम-नामाचा विस्तार होवो, त्याचा फैलाव होवो.